RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ७, अंक ११५] बुधवार, डिसेंबर २९, २०२१/पौष ८, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २१९**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २०२१.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर-२०१४/प्र.क्र.१२१/१४/मंउका.— भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन आणि अस्तित्वात असलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय उपाहारगृहांतील महाव्यवस्थापक, गट-अ, प्रशासन अधिकारी, गट-ब, सहायक गट-ब (अराजपत्रित) या पदांच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, ते जसे :—

(१) या नियमांना मंत्रालय उपाहारगृहांतील महाव्यवस्थापक, गट-अ, प्रशासन अधिकारी गट-ब (राजपत्रित), सहायक गट-ब (अराजपत्रित) सेवा प्रवेश नियम, २०२१ असे संबोधण्यात यावे.

(२) या नियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " उपाहारगृह " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय आहार/उपाहारगृहे.

(ब) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन.

(क) " मंत्रालयीन विभाग " याचा अर्थ विधि व न्याय विभागाची विधि शाखा वगळता, शासन कार्यनियमावली मधील नियम ४ व पहिल्या अनुसूचीमध्ये नमुद केल्यानुसार शासनाचा कोणताही मंत्रालयीन विभाग असा आहे.

३. उपाहारगृहातील महाव्यवस्थापक गट-अ या पदावरील नेमणुक मंत्रालयीन विभागातील अवर सचिव हे पद धारण करीत असलेल्या व्यक्तीच्या प्रतिनियुक्तीने करण्यात येईल.

४. उपाहारगृहातील प्रशासन अधिकारी, गट-ब या पदावरील नेमणुक मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी हे पद धारण करीत असलेल्या व्यक्तीच्या प्रतिनियुक्तीने करण्यात येईल.

५. उपाहारगृहातील सहायक, गट-ब (अराजपत्रित) या पदावरील नेमणुक मंत्रालयीन विभागातील सहायक कक्ष अधिकारी हे पद धारण करीत असलेल्या व्यक्तीच्या प्रतिनियुक्तीने करण्यात येईल.

६. नियम ३, ४ व ५ या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्त झालेल्या व्यक्तींना मूळ पदावर लागू असलेल्या अटी व शर्ती तशाच लागू राहतील.

७. नियम ३ ते ५ येथे नमूद केलेल्या पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेले प्रतिनियुक्तीचे नियम/धोरण लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुचिता मो. महाडिक,**
शासनाचे सहसचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 28th December 2021.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. RTR-2014/C.R.121/14/MCS.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments issued in that behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of General Manager, Group-A, Administration Officer, Group-B, and Assistant, Group-B (Non Gazetted), in Mantralaya Canteens under the General Administration Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the General Manager, Group-A, Administration Officer, Group-B (Gazzetted), and Assistant, Group-B (Non Gazetted), in Mantralaya Canteens (Recruitment) Rules, 2021.

2. In the rules, unless the context requires otherwise :–

(*a*) "Canteen" means Mantralaya canteens under the administrative control of the General Administration Department of the Government;

(*b*) "Government" means the Government of Maharashtra;

(*c*) "Mantralaya Department" means Departments of the Government, according to rule 4 as specified in the First Schedule appended to of the Maharashtra Government Rules of Business, except the legal sections of the Law and Judiciary Department.

3. Appointment to the post of General Manager, Group-A in Canteen shall be made on deputation of a person, holding the post of Under Secretary from Mantralaya Departments.

4. Appointment to the post of Administration Officer, Group-B in Canteen shall be made on deputation of a person, holding the post of Desk Officer from Mantralaya Departments.

5. Appointment to the post of Assistant, Group-B (Non-Gazetted) in Canteen shall be made on deputation of a person, holding the post of Assistant Section Officer from Mantralaya Departments.

6. The same terms and conditions of the original posts shall be applicable to the person appointed on deputation to the posts mentioned in rules 3, 4 and 5.

7. The terms and condition for the appointment of the posts mentioned in the rules 3, 4 and 5 shall be as per the deputation policy and the rules framed by the State Government, from time to time.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUCHITA M. MAHADIK,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.